महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

Institute Code - 0131  DTE Code - 6015

# शासकीय तंत्रनिकेतन, मिरज

माजी सैनिक वसाहती जवळ, एम.आय.डी.सी., विद्यानगर,

मिरज – ४१६ ४१०. कार्यालय : ०२३३–२२३१४२३

Web : www.gpmiraj.ac.in  E-mail : gpmiraj@gmail.com




**डॉ. एस. ए. परदेशी**

प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, मिरज.

| अभ्यासक्रम | जागा |
|---|---|
| Diploma in Mech. Engg. (यंत्र अभियांत्रिकी पदविका) | 60 |
| Diploma in Civil Engg. (स्थापत्य अभियांत्रिकी पदविका) | 60 |
| Diploma in Comp. Engg. (संगणक अभियांत्रिकी पदविका) | 60 |
| Diploma in Medical Electronics (मेडिकल इलेक्ट्रॉनिक्स पदविका) | 30 |
| Diploma in Polymer Tehnology (पॉलीमर टेक्नॉलॉजी पदविका) | 40 |

**संस्थेकडे येण्याचे मार्ग – शहर बस सेवा उपलब्ध :**

१) मिशन हॉस्पिटल/पंढरपूर रोड – ईसापुरे हॉस्पिटल – माजी सैनिक वसाहत – शासकीय तंत्रनिकेतन, मिरज.

२) कॅन्सर हॉस्पिटल – मिरज एमआयडीसी रोड – एम.एस.ई.बी. सब स्टेशन – शासकीय तंत्रनिकेतन, मिरज.

## संस्थेची माहिती :

शासकीय तंत्रनिकेतन, मिरज ही महाराष्ट्र शासनाची तांत्रिक पदविका शिक्षण देणारी शैक्षणिक संस्था असून ती १९९० पासून सांगली जिल्ह्यामध्ये कार्यरत आहे. सध्या मेकॅनिकल इंजि., सिव्हील इंजि., कॉम्प्युटर इंजि., मेडिकल इलेक्ट्रॉनिक्स, पॉलीमर टेक्नॉलॉजी हे अभ्यासक्रम सुरू आहेत. संस्था MIDC च्या परिसरात असल्यामुळे प्रशिक्षणाची व नोकरीची उत्तम संधी उपलब्ध आहे. मेडिकल इलेक्ट्रॉनिक्स आणि पॉलीमर टेक्नॉलॉजी हे पदविका अभ्यासक्रम देणारी पुणे विभागातील महाराष्ट्र शासनाची ही एकमेव अग्रगण्य संस्था आहे.

## संस्थेची वैशिष्ट्ये :

- **१००% मुलींची मोफत शिक्षण योजना**
- **NBA मानांकित २ विभाग.**
- **वसतिगृह –** क्षमता : मुले – ८६ व मुली ८६. सीसीटीव्ही व बायोमेट्रिक अटेन्डन्स ची सोय. मुलांचे व मुलींचे वसतिगृहात ओपन जिमची सोय.
- **अल्पसंख्यांक वसतिगृह –** अल्पसंख्यांक मुलींचे १०० क्षमतेचे स्वतंत्र वसतिगृह.
- **डॉ. पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता वसतिगृह –** मुलींचे ५० क्षमतेचे स्वतंत्र वसतिगृह.
- **ग्रंथालय –** पुस्तके, मासिके, वृत्तपत्रे, डिजीटल लर्निंग, जर्नल्स व अभ्यासिकेसहीत सुसज्ज व प्रशस्त ग्रंथालय उपलब्ध.
- अत्याधुनिक डिजीटल सुविधा.
- भव्य क्रीडांगण.
- वर्गखोलीत व प्रयोगशाळेत स्मार्ट बोर्डचा वापर.
- **उपहार गृह –** संस्थेतील विद्यार्थ्यांना अत्यंत माफक दरात गुणवत्तापूर्ण खाद्यपदार्थ उपलब्ध.
- **विद्यार्थी ग्राहक भांडार –** माफक दरातील शैक्षणिक साहित्य उपलब्ध.
- संस्थेत जास्तीत जास्त सौर उर्जेचा वापर.
- **MSBTE पुरस्कृत अत्याधुनिक प्रोग्रॅमिंग व प्रकल्प प्रयोगशाळा.**
- **CET परीक्षा केंद्र (१५० संगणकांसह)**

## शासकीय तंत्रनिकेतन, मिरजला प्रवेश घेण्याचे फायदे :


- CNC व VMC सह सुसज्ज कर्मशाळा (Workshop)
- सातत्याने उज्वल निकालाची परंपरा.
- नोकरी / व्यवसायाची उत्तम संधी.
- संस्था संपूर्ण शासकीय असल्यामुळे नियमानुसार अत्यल्प शुल्क.
- शासनाच्या विविध सवलतींचे/योजनांचे/शिष्यवृत्तीचे लाभ विद्यार्थ्यांना कुठल्याही विलंबाशिवाय मिळतात.
- महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) मार्फत निवड केलेल्या अनुभवी व तज्ञ शिक्षकांचे मार्गदर्शन.
- सुसज्ज आणि अद्ययावत प्रयोगशाळेमुळे विद्यार्थ्यांना विषय समजण्यास सोईस्कर.
- विद्यार्थ्याला वसतीगृहात राहण्याची कमीत कमी खर्चामध्ये सोय.
- संस्थेअंतर्गत विभागीय खेळाच्या स्पर्धेत सांघिक व वैयक्तिक खेळात सहभागी होऊन प्राविण्य मिळवण्याची संधी.
- मुलांसाठी वसतिगृहात अत्याधुनिक व्यायामशाळा.
- स्नेह सम्मेलनाद्वारे विद्यार्थाच्या विविध कलागुणांना वाव.
- विविध विषयांवर कार्यशाळेचे आयोजन व प्रबंध सादरीकरण.
- रक्तदान शिबीर, आरोग्य तपासणी, प्रश्नमंजुषा, वक्तृत्व स्पर्धा, वृक्षारोपण इत्यादी सामाजिक उपक्रम राबवून विद्यार्थ्यांची सर्वांगीण प्रगती.

## संस्थेचे ध्येयवाक्य :


उच्च नीतीमूल्ये व राष्ट्रीय संवेदना असलेले उद्योगाभिमुख सक्षम तंत्रज्ञ विकसित करणे.


## संस्थेची ध्येयप्रणाली :

- अद्ययावत शिक्षण प्रक्रियेमधून बौद्धिक अधिक्षमता व निरंतर शिकण्याची वृत्ती जोपासणे.
- प्रयोगशीलता व औद्योगिक साहचर्य ह्यातून तांत्रिक कौशल्ये बिंबवणे.
- उद्योजकतेला प्रोत्साहन देणे व पर्यावरण रक्षणाची जाणीव वृध्दिंगत करणे.
- संस्थेतील पोषक शैक्षणिक वातावरणाद्वारे नीतीमूल्ये, व्यावसायिकता व राष्ट्रीय संवेदना वाढीस लावणे.









Computer Engg. Lab.  CET Lab.

## प्रवेशाची माहिती –

दहावी परिक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर प्रवेश नियंत्रण प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांचे मार्फत सर्व मुख्य वर्तमानपत्रांमध्ये प्रवेश प्रक्रियेची सूचना प्रसिध्द करण्यात येते. तसेच **www.dtemaharashtra.gov.in** व **www.gpmiraj.ac.in** या संकेतस्थळावर सुध्दा प्रसिध्द केली जाते.

- विद्यार्थ्यांनी प्रवेशाकरीता ऑनलाईन अर्ज www.dtemaharashtra.gov.in या संकेत स्थळावर भरणे आवश्यक असते.
- साधारण मे–जून महिन्यात प्रवेश प्रक्रिया सुरू होते.
- प्रवेश प्रक्रियासंदर्भात सविस्तर समुपदेशन व इतर माहिती संस्थेच्या सुविधा केंद्रामध्ये दिली जाते.

## शिष्यवृत्ती –

- भारत सरकार शिष्यवृत्ती (SC, ST, OBC, SBC)
- फ्री–शिप – (SC, ST, NT/VJ, OBC, SBC)
- राजर्षी छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजना (EBC, OBC, Open)
- पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता
- अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती.
- AICTE / MSBTE Scholarship.

## प्रवेश पात्रता –

- प्रथम वर्ष– १० वी पास, कमीत कमी ३५% गुण आवश्यक.
- थेट द्वितीय वर्ष प्रवेश – १२ वी विज्ञान (PCM), १० वी नंतर २ वर्षाचा आय.टी.आय कोर्स पूर्ण.

## प्रथम/थेट द्वितीय वर्ष पदविका प्रवेशासाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे –

- SSC/HSC (Sci.)/ ITI गुणपत्रिका
- शाळा सोडल्याचा (School Leaving) दाखला
- नॉन क्रिमिलेअर (Non-Creamy Layer) प्रमाणपत्र
- जात/जमात (Caste/Tribe) प्रमाणपत्र
- अधिवास (Domicile) प्रमाणपत्र
- उत्पन्नाचे (Income) प्रमाणपत्र
- आर्थिक दृष्ट्या दुर्बल (EWS) प्रमाणपत्र
- सैन्य दलातील (Defense) प्रमाणपत्र
- अल्पसंख्यांक (Minority) प्रमाणपत्र
- बचत खाते (आधार क्रमांक संलग्नित)

## शैक्षणिक शुल्क –

- SC/ST/VJ/NT - **Rs. 1750/-**
- EBC/OBC - **Rs. 4750/-**
- Open - **Rs. 7750/-**

## विभागांची माहिती

**यंत्र विभाग – (Mechanical Engg. Dept.)**
**(NBA मानांकन प्राप्त विभाग)**

**संपर्क – डॉ. व्ही. एम. कुलकर्णी** (विभाग प्रमुख) – मो.नं.– ९३७१२२८९९०

यंत्र अभियांत्रिकी शाखेत वेगवेगळ्या मशीन्स, वाहने/गाड्यांचे डिझाईन्स, उत्पादन व दुरुस्ती यांचे प्रात्यक्षिकाद्वारे व्यावहारिक ज्ञान दिले जाते. जागतिक औद्योगिक क्रांतीत यंत्र अभियांत्रिकीचे महत्त्वपूर्ण योगदान आहे.

**पदविका नंतरचे भविष्य :** पदवी इंजिनिअरिंगच्या थेट द्वितीय वर्षात प्रवेश, मल्टीनॅशनल कंपनी उदा. टाटा मोटर्स, बजाज ॲटो, महिंद्रा ॲन्ड महिंद्रा, जी-इंडिया, कमिन्स इंडिया, अल्फा लावल, थायसन्स ग्रुप यासारख्या कंपन्यांमध्ये, तसेच ज्युनिअर इंजिनिअर, सहाय्यक मोटार वाहन निरिक्षक (ARTO), MIDC (सहाय्यक अभियंता), टेक्नीशियन, बांधकाम विभाग (PWD), रेल्वे, संरक्षण विभाग (MES, DRDO), ONGC इत्यादी ठिकाणी नोकरीची संधी उपलब्ध आहे.

**स्थापत्य विभाग –** (Civil Engg. Dept.)

**संपर्क– डॉ. के. एम. बागवान** (विभाग प्रमुख) – मो.नं. ९७३०५२०१७८

स्थापत्य अभियांत्रिकी ही एक व्यावसायिक अभियांत्रिकी शाखा असून त्यामध्ये रस्ते, इमारत, पूल, महामार्ग, कालवे, बांध, विमानतळ, रेल्वे, पाईपलाईन, सिवरेज सिस्टीम, डिझाइन, इमारतीचे संरचनात्मक घटक इत्यादी निर्मितीचे आणि देखभालीचे काम हाताळण्याचे शिक्षण दिले जाते.

**पदविका नंतरचे भविष्य :** पदवी इंजिनिअरिंगच्या थेट द्वितीय वर्षात प्रवेश, पाटबंधारे विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग (PWD), रेल्वे, व्हॅल्युअर, जिल्हा परिषद, सर्व्हेअर, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, इंटिरिअर डेकोरेटर, खाजगी बांधकामाची कामे, कॉन्ट्रॅक्टर, सुपरवायझर, ड्राफ्टस्मन, बिल्डींग प्लॅनर, संरक्षण विभाग (MES, DRDO) इत्यादी ठिकाणी नोकरी अथवा व्यवसायाची संधी उपलब्ध आहे.

**संगणक विभाग – (Computer Engg. Dept.)**

**संपर्क– श्री. ए. एल. तरंगे** (विभाग प्रमुख) – मो.नं.– ९८९०१७५३९३

संगणक अभियांत्रिकी ही अलीकडील काळातील अद्ययावत अभियांत्रिकी शाखा असून त्यामध्ये प्रामुख्याने संगणक प्रणाली (हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर) हे विषय हाताळले जातात. या शाखेत विविध संगणकाच्या भाषा, नेटवर्कींग, वेब डेव्हलपमेंट, डिझाईन, डाटाबेस, नेटवर्क, ॲडमिनिस्ट्रेशन अशा प्रकारचे शिक्षण दिले जाते.

**पदविका नंतरचे भविष्य :** पदवी इंजिनिअरींगच्या थेट द्वितीय वर्षात प्रवेश, सॉफ्टवेअर इंजि., सिस्टीम ॲडमिनिस्ट्रेटर, महानगरपालिका, बीएसएनएल, भारतीय रेल्वे, बँक, एलआयसी, बीपीओ, तसेच शासनाच्या व खाजगी कंपनीत संगणक अभियंता म्हणून नोकरी अथवा व्यवसायाची संधी उपलब्ध आहे.

**मेडिकल इलेक्ट्रॉनिक्स–(Medical Electronics Dept.)** (NBA मानांकन प्राप्त विभाग)

**संपर्क– श्री. बी. व्ही. यादव** (विभाग प्रमुख) मो.नं.– ८१०४४६९८६८

कोरोनासारख्या जागतिक साथीच्या आजारांमध्ये आधुनिक उपकरणांचा वापर करणारी आणि इंजिनिअरिंग व मेडिकल या दोन्ही क्षेत्रांचे एकत्रित ज्ञान देणारी शाखा. पल्स ऑक्सिमिटर, व्हेंटिलेटर, सोनोग्राफी, ईसीजी, एमआरआय, सीटी स्कॅन यासारख्या मेडिकल संबंधित उपकरणांची दुरुस्ती व देखभाल करावयाचे ज्ञान विद्यार्थ्यांना दिले जाते. यामध्ये विद्यार्थ्यांना सहा महिन्यांचे हॉस्पिटल प्रशिक्षण दिले जाते. त्यामुळे विद्यार्थी कौशल्य व प्रात्यक्षिक यांमध्ये तरबेज होतो.

**पदविका नंतरचे भविष्य :** पदवी इंजिनिअरिंगच्या थेट द्वितीय वर्षात प्रवेश, शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागात तसेच खाजगी रुग्णालय, आरोग्य क्षेत्र यामध्ये नोकरीच्या संधी उपलब्ध आहेत. तसेच बायोमेडिकल इंजिनिअरिंग या शाखेत उच्च शिक्षणही उपलब्ध आहे.

**पॉलीमर टेक्नॉलॉजी– (Polymer Technology)**

**संपर्क– डॉ. यु. प्रे. चौहान** (विभाग प्रमुख) मो.नं.– ९९६०५९०१९५

(Highest Package 6.30 L)

वैशिष्ट्यपूर्ण रोजगार पूरक अभ्यासक्रम असलेली पुणे विभागात पॉलीमर टेक्नॉलॉजी पदविका देणारी एकमेव संस्था. दैनंदिन जीवनातील वापराच्या जास्तीत जास्त वस्तू या प्लॅस्टिकपासून तयार केलेल्या असल्यामुळे व येत्या ५ वर्षात त्याचा वापर तिप्पट होणार असल्यामुळे १००% नोकरीची संधी उपलब्ध. अभ्यासक्रमाच्या सहाव्या सत्रात ६ महिन्यांचे औद्योगिक प्रशिक्षण दिले जाते.

**पदविका नंतरचे भविष्य :** पदवी इंजिनिअरिंगच्या थेट द्वितीय वर्षात प्रवेश, प्लॅस्टिक, केमिकल, पेट्रोकेमिकल अशा पदवीच्या शाखांकरिता प्रवेशास पात्र. प्लॅस्टिक सिन्थेसिस, प्लॅस्टिक प्रोसेसिंग, रबर इंडस्ट्री, ऑईल, पेंटस् इंडस्ट्री, ॲटोमोबाईल, एरोस्पेस अशा विविध क्षेत्रात नोकरी संधी उपलब्ध आहेत.

## PLACEMENT (2024-25)

| S. N. | Name of Student | Name of Industry | Package | Photo |
|---|---|---|---|---|
| 1 | Mr. Aqueeb Jamadar | Napco National, Jeddah, Saudi Arebia | 6.30 Lakh / Annum | |
| 2 | Mr. Izaz Sayyed | Napco National, Jeddah, Saudi Arebia | 5.90 Lakh / Annum | |
| 3 | Mr. Sahil Ghagare | Napco National, Jeddah, Saudi Arebia | 5.90 Lakh / Annum | |
| 4 | Mr. Avdhoot Shinde | Delta Irrigation LLP Plot No. A-234, Kagal Five Star MIDC, Kagal, Kolhapur. | 2.16 Lakh / Annum | |
| 5 | Mr. Jainuddin Attar | Delta Irrigation LLP Plot No. A-234, Kagal Five Star MIDC, Kagal, Kolhapur. | 2.16 Lakh / Annum | |
| 6 | Mr. Ruturaj Unhale | Delta Irrigation LLP Plot No. A-234, Kagal Five Star MIDC, Kagal, Kolhapur. | 2.16 Lakh / Annum | |

## सहयोगी विभाग

**उपयोजित यंत्रशास्त्र विभाग** (Applied Mech. Dept.)

**संपर्क – श्री. ए. वाय मिस्त्री** (विभाग प्रमुख) मो.नं.– ७२४९२६८०७८

उपयोजित यंत्रशास्त्र हे विभाग संरचना, काँक्रीट आणि मृदा अभियांत्रिकीमध्ये तज्ञ असून येथील सर्व प्रयोगशाळा आधुनिकतम उपकरणाने सज्ञ असून या प्रयोगशाळेत विविध प्रयोग करण्यात येतात. सर्व विषयांतील प्रथम वर्ष अभियांत्रिकी अभ्यासासाठी अभियांत्रिकी यंत्रणा सारख्या मुलभूत विषयांचा अभ्यास करणे, मटेरियलचे सामर्थ्य, विश्लेषण आणि प्रचलित क्रॉंक्रीट सरंचनाचे डिझाइन, स्टील स्ट्रक्चर्स, काँक्रिट संरचना, काँक्रिट तंत्रज्ञान आणि सिध्दांत यांचा समावेश आहे.

**विज्ञान व मानव्यशास्त्र विभाग** (Science & Humanities Dept.)

**संपर्क – श्री. एम. एस. कागवाडे** (विभाग प्रमुख) मो.नं.– ९९२२२७३८४४

विज्ञान व मानव्यशास्त्र विभागामध्ये इंग्रजी, गणित, भौतिकशास्त्र आणि रसायनशास्त्र यासारख्या विषयांचा समावेश असून प्रथम वर्ष प्रवेशित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व समुपदेशन करण्याकरीता महत्वपूर्ण भुमिका बजावतात, जेणेकरून विद्यार्थी अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञानाच्या अभ्यासापर्यंत सहज संक्रमण करू शकतील. विभागाचे मुख्य उद्दिष्ट मुलभूत विज्ञानातील संकल्पनात्मक आदान–प्रदान करणे आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या मुळ अभियांत्रिकी अभ्यासक्रमात प्रवेश करण्यासाठी एक मंच म्हणून हा विभाग कार्य करतो. विभागात संवाद कौशल्य, व्यक्तिमत्व विकास, संघ कौशल्य, नेतृत्व कौशल्य या सारख्या सर्व पैलूंमध्ये विद्यार्थ्यांना सक्रिय शिक्षण दिले जाते.

**प्रशिक्षण व आस्थापना विभाग (Training & Placement Dept.)**

**संपर्क – श्री. डी. डी. गायकवाड** (प्रशिक्षण व आस्थापना अधिकारी) मो.नं.– ९८६०९०६११७

या विभागामार्फत विद्यार्थ्यांना पदविका पूर्ण झाल्यानंतर नोकरीच्या विविध संधी उपलब्ध करून देण्यासाठी विविध प्रसिध्द कंपन्यांचे कॅम्पस इंटरव्ह्यू किंवा ऑनलाईन इंटरव्ह्यू आयोजित केले जातात. तसेच विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता कौशल्ये वाढीस लावण्यासाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रम घेतले जातात. या संस्थेत पुढील प्रसिध्द कंपन्यांचे इंटरव्ह्यू होतात.

GE India, Cummins India, Wave Suspension, Precision Sales Mfg., JSW Steel, Bajaj Auto, Tata Consulting Engineers, Thought Works Inc., Carestream Dental India Pvt. Ltd. Horizon Medical Systems, Krishna Design Pvt. Ltd.

**कर्मशाळा (Workshop)**

**संपर्क – श्रीमती जी. जी. मुजावर** (कर्मशाळा अधिक्षक) मो.नं.– ९६६५३११६३२

कर्मशाळा विभागात अद्ययावत प्रॉडक्शन CNC मशीन्स उपलब्ध आहेत व त्यासाठी लागणारे प्रोग्रॅमिंग शिकता येते. तसेच कारपेंट्री, फिटींग, वेल्डींग, शीटमेटल, प्लंबींग या शॉपमध्ये कौशल्ये (हँडस्किल्स) शिकविले जातात. याचा उपयोग दैनंदिन कामकाजात, कारखान्यात होतो. या सर्व अनुभवांमुळे औद्योगिक नोकरीत फायदा होतो.



Medical Electronics Lab.



Civil Engineering



Mechanical Engineering



मान्यवरांची भेट